“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2018-19

दै. पुढारी

14/6/2018

# कदम कॉलेजमध्ये बापूजी साळुंखे जयंती

**इचलकरंजी (प्रतिनिधी) :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. सी. आर. पाटील होते. यावेळी प्र. प्राचार्य डॉ. पाटील, प्रा. अशोक पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा.डॉ.सुभाष जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एम. एम. कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. ए. यादव यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

22 / 6 / 2018

## शिक्षणाचा वटवृक्ष डॉ. बापूजी साळुंखे यांनी रूजवला : प्रा. पाटील

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम कॉलेजमध्ये शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे जन्म शताब्दी वर्षानिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी प्रा.अशोक पाटील यांनी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या कार्याचा आढावा घेतला. रामपूर सारख्या छोट्याशा खेडे गावात जन्म घेतलेल्या एका सामान्य कुटुंबातील मुलगा शिक्षणाच्या क्षेत्रात आपला ठसा उमटून वटवृक्ष करतो. यातून जगाच्या पाठीवर श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विद्यार्थी चमकताना दिसतात. इतकेच नव्हेतर बापूजींनी श्री. स्वामी विवेकानंदांचे विचार तरूण विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रूजविण्याचे कार्य केले व ते आजही संस्थेच्या माध्यमातून सुरू आहे असे मत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सी.आर.पाटील उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी बापूजींनी जे शैक्षणिक क्षेत्रातील काम नेत्रदिपक आहे. त्यांनी डी. के. ए. एस. सी. कॉलेजची स्थापना करून इचलकरंजीतील सामान्य लोकांच्या मुलांची शिक्षणाची सोय केली. महाविद्यालयाचे विद्यार्थी चमकताना दिसतात. याचेच फलीत म्हणजे या महविद्यालयास 'अ" मानांकन प्राप्त झाले आहे असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा.डॉ. सुभाष जाधव यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. एम.एम. कांबळे यांनी केले. या कार्यक्रमास ज्युनिअर व सिनिअर स्टाफ, कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रा.डी.ए.यादव यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार, १६ जुलै २०१८

# डीकेएएससी महाविद्यालयमध्ये वृक्षारोपण

**इचलकरंजी :** डि.के.ए.एस.सी महाविद्यालयाच्यावतीने माणगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी आंबा, पिंपळ, अशोक आदी विविध प्रकारच्या झाडांच्या रोपाचे वृक्षारोपन करण्यात आले. वाढीसाठी उपयुक्त घटक पुरवून वृक्ष जतन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. यावेळी प्रचार्य डॉ.सी.आर.पाटील, कॅप्टन मोहन विरकर, प्रा.डॉ.एस. टी. इंगळे, प्रा.डी.ए.यादव उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार, ३० जुलै २०१८



इचलकरंजी : महाविद्यालयात आयोजित विवेक वाहिनीचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना.

# 'कन्या व डिकेएएससी'मध्ये विवेक वाहिनीचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयात विवेक वाहिनीचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र अनिसचे कृष्णात स्वामी उपस्थित होते. ते म्हणाले की, विवेकाचा आवाजच मानसिक कुपोषण संपवण्याचा समृध्द पर्याय ठरू शकतो. वर्तमानाच्या बिघडलेल्या प्रकृतीसाठी सर्वोत्तम उपचार म्हणजेच विवेक वाहिनी. आयुष्य म्हणजे अनेक योग्य अयोग्य वाटांचा गुंता आहे. सोईची वाट निवडण्यासाठी विवेकाचा आधार महत्वाचा आहे.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अनिल पाटील होते. त्यांनी, आपल्या आतील प्रश्नांना शब्दरूप देण्यासाठी या मंचाचा उपयोग करा. प्रश्नांची उत्तरे हा दुसरा भाग आहे. प्रश्न पडणे किंवा प्रश्न मांडणे हा पहिला भाग मला महत्वाचा वाटतो, असे उद्गार त्यांनी काढले.

गतवर्षीचा अहवाल दिपाली कांबळे यांनी मांडला. विभावरी नकाते यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन स्नेहल माळी यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा.सौ.संगिता पाटील, प्रा.डॉ.त्रिशला कदम , प्रा.डॉ.विनायक पवार उपस्थित होते. हुमा कुरेशी यांनी आभार मानले.

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँण्ड सायन्स महाविद्यालयातील विवेकवाहिनी चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कृष्णात स्वाती म्हणाले, व्यापक विचार करून नव्या विचारांचा स्वीकार केला पाहिजे.

अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही.एस.वांद्रे होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. डी. ए.यादव, प्रा.एम.एम.कांबळे, प्रा. घोडके, प्रा.व्ही.बी.पाटील, -प्रा.सौ.चनगुंडी, जिमखाना प्रमुख प्रा.आकाश बनसोडे व उपस्थित होते.ऋषीकेश राऊत यांनी सुत्रसंचालन केले: प्रा.डी.ए.यादंव यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

तरुण भारत
मंगळवार, ३१ जुलै २०१८

# डीकेएएससी महाविद्यालयात 'बीज मटका'' उपक्रमाला प्रारंभ

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

मांनवाने आपली नैतिक जबाबदारी लक्षात घेवून आपणही निसर्गाचे देणे लागतो. महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांने निसर्ग उपयूक्त उपक्रमांत सहभागी होवून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. विद्यार्थ्यांनी पर्यावरणाशी आपली जागरूकता वाढवावी, असे मत प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ.सी.आर.पाटील यांनी व्यक्त केले.

ते येथील डीकेएएससी महाविद्यालयातील बीज मटका उपक्रम प्रारंभी प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ.व्ही.ए.पाटील होते. डॉ.एस.टी. इंगळे, व मधुरा शिंदे उपस्थित होते.



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यायाच्या बीज मटका उपक्रम उद्घाटन करताना प्राचार्य सी. आर. पाटील**

यावेळी बोलताना मधुरा शिंदे म्हणाल्या, मटका बीज तयार करण्यासाठी पहिल्या दिवशी बीया गरम कोमट पाण्यात एक तास भिजवून मातीत व शक्य असल्यास खतामध्ये एकजीव करून मटक्यात भरून मटका शेणामध्ये किंवा मातीत गाडून रात्रभर गाडून ठेवावे. तर दुसऱ्या दिवशी तयार करण्यात आलेला बीज मटका हा दऱ्या खोऱ्यात, डोंगराळ भागात फेकली जातात. अनेक ठिकाणी या प्रकारचा उपयोग करून बीज रोपन केले जाते.

बीजरोपन मटका बीजच्या सहाय्याने वनस्पतीशास्त्र विभागाचे विद्यार्थी कोल्हापूर जिल्ह्यातील रामलिंग, कुंथूगिरी, पन्हाळगड, जोतिबा डोंगर, आदी जिल्ह्यातील विविध ठिकाणी करणार असल्याची माहिती दिली.

या कार्यक्रमावेळी वनस्पतीशास्त्र विभाग व अधिविभागातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थींनी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. आभार ऋषिकेश राऊत यांनी मानले.

Scanned with CamScanner

तरुण भारत
१३ ऑगस्ट २०१८

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयात 'आत्मसंरक्षण'वर व्याख्यान

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम महाविद्यालयात तक्रारनिवारण समितीचे उदघाटन व 'आत्मसंरक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. इचलकरंजीच्या पोलिस सब–इन्स्पेक्टर सौ.शरयू देशमुख प्रमुख पाहुण्या होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. व्ही. एस. वांद्रे होते. समितीच्या अध्यक्षा प्रा.सौ.शैलजा चनगुंडी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. सौ.शरयू देशमुख यांनी महिलांनी स्वत:ची सुरक्षितता स्वत:च करणे महत्वाचे आहे, त्यासाठी त्यांनी धाडसी होण्याची गरज आहे, असे मत व्यक्त केले. प्रा.व्ही.एस.वांद्रे यांनी मुलींची सुरक्षितता तसेच त्यांचे कुटुंबातील स्थान या विषयीचे आपले विचार मांडले. प्रा.सौ. सविता वेदांते यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.सौ.सुवर्णा कदम, प्रा.डॉ.सौ. पद्मश्री वाघमारे, प्रा.आकाश बनसोडे, प्रा.वी.डी.कदम यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ.सी.आर.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत

5/9/2018



इचलकरंजी : केरळ मदतीसाठी गोळा करण्यात आलेली रक्कम महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. व्ही. एस. वांद्रे यांच्याकडे सुपुर्द करताना विद्यार्थी.

# राष्ट्रीय सेवा योजना, समाजशास्त्र विभागाची केरळला मदत

प्रतिनिधी
इचलकरंजी

डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व समाजशास्त्र विभागाच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी संपूर्ण महाविद्यालातून आर्थिक मदत गोळा करण्यात आली. महाविद्यालय परिसरात जागोजागी ठेवण्यात आलेल्या मदत पेटीत विद्यार्थ्यांनी पैसे टाकून आर्थिक मदत केली.

ही मदत महाविद्यालयाचे इनचार्ज प्राचार्य प्रा. व्ही. एस. वांद्रे व मुख्य प्रबंधक डी. एम. लोकरे यांच्याकडे देण्यात आली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. डी. ए. यादव, प्रा. एम. एम. कांबळे, समाजशास्त्र विभागाचे प्रा. अर्जुन जाधव, प्रा. टी. ए. हराळे, प्रा. डी. जी. घोडके तसेच राष्ट्रीय सेवा योजना व समाजशास्त्र विभागाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
5/9/2018

# ओला, सुका कचरा व्यवस्थापन कार्यशाळा

## इचलकरंजी परिसरातील सर्व महाविद्यालयांचा सहभाग

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत 'ओला व सुका कचरा व्यवस्थापन' कार्यशाळा उत्साहात पार पडली. रुकडी, वडगांव, हातकणंगले, हुपरी व इचलकरंजी परिसरातील सर्व महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. या कार्यशाळेचे उद्घाटन हातकणंगले गटविकास अधिकारी अरविंद धरणगुत्तीकर यांच्या हस्ते झाले. स्वच्छतेविषयी जागरूकता वाढावी तसेच पंचगंगा नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन धरणगुत्तीकर यांनी केले.

इचलकरंजी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. स्वयंसेवकांनी स्वच्छता दुत म्हणून समाजात काम केले पाहिजे. स्वयंसेवक म्हणून प्रबोधनातून प्लॉस्टिक बंदी केली पाहिजे. 'स्वच्छता ॲपविषयी माहिती देवून वापरण्याचे आवाहन इचलकरंजी पालिकेचे अतिरिक्त मुख्याधिकारी डॉ. पवन म्हेत्रे यांनी केले. स्वच्छता मोहिमेतून कचरामुक्त परिसर करण्यासाठी प्रत्यक्षिकांतून या कार्यशाळेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.




इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत प्रत्यक्षिके दाखविताना.

यावेळी पालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ.सुनिल संगेवार यांनी प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले.

सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकांनी आपली मनोगते व्यकत केली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे होते.

यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. ए. यादव, प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. वांद्रे, प्रा. सौ.वेल्हाळ, प्रा. सौ. वाघमारे, प्रा. सौ. ढोबळे उपस्थित होते. तसेच सर्वच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वंयमसेवक स्वंयमसेविका, प्राध्यापक उपस्थित होते.

सुत्रसंचालन ऋषिकेश राऊत यांनी केले. प्रा. एम. एम. कांबळे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

तरुण भारत

10/9/2018

# डीकेएएससीत विद्यार्थ्यांनी अनुभवली रानभाज्यांची चव

## रानभाज्यांपासून पाककृती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

डीकेएएससी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्या बॉटनी क्लबच्या वतीने रानभाज्यांपासून पाककृती स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन आहारतज्ज्ञ प्रा. संगीता पाटील यांच्या हस्ते झाले. यांत्रिकीकरणच्या धावपळीत चुकीचा आहार न घेता, योग्य आहार घेतला पाहिजे. वेगवेगळ्या रानभाज्यातून रोगप्रतिकारक शक्ती आपल्याला मिळते. आपल्या भागात जे पिकत, ते आपण भरपूर सेवन केले पाहिजे, असे आवाहन. प्रा.संगीता पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मिलिंद हुजरे होते.



**इचलकरंजी – येथील डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित रानभाजी पाककला स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी व परिक्षक**

रानभाज्यांची चव विद्यार्थ्यांना अनुभवता येईल यासाठी ही स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पातरी, घोळी, शेवग्याची पाने, कुरडू आळु आघाडा, हादगाफूल, टाकळा, केळफूल, तोंडले, करटोली, भोपळ्याचे वेल, भारंगी, भुई आवळी रानभाज्यापासून आकर्षक पदार्थ बनवले होते.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक आसावरी किणेकर व सोनम जाधव यांना विभागून क्रमांक देण्यात आला. द्वितीय क्रमांक रेवती गायकवाड, तृतीय क्रमांक पद्मकांश जोशी व रोहीत गायकवाड तसेच पुजा चिल्लाळ यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले.


यावेळी प्रोफेसर डॉ.सी.आर. पाटील यांनी विद्यार्थ्यांना दुर्मिळ रानभाज्या आणि त्यापासून होणारा फायदा या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी ग्रंथपाल सौ. प्रतिभा पाचंगे, प्रा.व्ही.एस.वांद्रे, प्रा.डॉ. व्ही.ए.पाटील, प्रा. डॉ.एस.टी. इंगळे तसेच वनस्पतीशास्त्र विभाग, अधिविभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत 28/9/2018

तरुण भारत शुक्रवार, २८ सप्टेंबर २०१८





इचलकरंजी : पंचगंगा नदीघाट स्वच्छ करण्यात आल्याचे पहिल्या छायाचित्रात दिसत आहे तर दुसऱ्या छायाचित्रात डीकेएएससीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले स्वयंसेवक दिसत आहेत.

# पंचगंगा घाट, शहापूर खण परिसर स्वच्छ

## गणेश विसर्जनानंतर इचलकरंजीत स्वच्छता मोहिमेत विविध सामाजिक संघटना व शाळांचा सहभाग : स्वच्छतेविषयी विद्यार्थ्यांचे पथनाट्य सादर

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

सार्वजनिक गणेश विसर्जनानंतर येथील पंचगंगा नदीघाट व शहापूर खण परिसर स्वच्छ करण्यात आला. मुख्याधिकारी दीपक पाटील यांच्या मार्गशदर्शनाखाली विसर्जनस्थळी नगरपालिकेच्या वतीने २५५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती. स्वच्छता मोहिमेत शहरातील विविध सामाजिक संघटना व शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

पंचगंगा नदीघाटावर सोमवारी सकाळी पावणेसात वाजता मिरणुकीची सांगता झाली. यावेळी नदी पात्रात जवळपास ५७४ तर शहापूर खणीत १२४ गणेश मुर्तींचे विसर्जन करण्यात आले. नदीचे प्रदुषण टाळण्यासाठी नगरपालिका व विविध सामाजिक संघटनांच्यावतीने नागरिकांना स्वच्छतेचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनास



इचलकरंजी : येथील के. एल. मलाबादे चौकात स्वच्छता अभियानानंतर शाळा व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. यावेळी नगराध्यक्षा अॅड. अलका स्वामी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

शहरवासीयांनी व गणेश मंडळांनी उदंड प्रतिसाद दिला. यामुळे जवळपास १० टन निर्माल्य नगरपालिका यंत्रणेकडे जमा झाले आहे. यामधून ५०० किलो प्लॉस्टिक वेगळे करण्यात आले.

अनंत चतुर्दशीनंतर इचलकरंजी नगरपालिका, रोटरी क्लब सेंन्ट्रल, शहरातील विविध सामाजिक संघटना, शाळेतील जवळपास ४०० विद्यार्थी व शिक्षकांमार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मोहिम राबविण्यात आली. यावेळी शहरातील छत्रपती शाहू पुतळा ते झेंडा चौक या रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. के. एल. मलाबादे चौक येथे नगराध्यक्षा अॅड. अलका स्वामी यांच्या उपस्थितीत मान्यवरांकडून स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. तसेच स्वच्छता ही सेवा या उपक्रमाअंतर्गत स्वच्छतेबाबत आवाहन करण्यात आले. यावेळी रूकडी येथील राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत स्वच्छतेविषयी पथनाट्य सादर करण्यात आले. इचलकरंजी येथील डिकेएएससी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पंचगंगा नदीघाटावर ४ तास स्वच्छता मोहिम राबवून २ टन निर्माल्य व प्लॉस्टिकचा कचरा जमा केला. प्राचार्य मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डी.ए. यादव यांनी मोहिम राबविली. यावेळी प्रा.एम.एम.कांबळे, विद्यार्थी प्रतिनिधी ऋषिकेश राऊत यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या ८५ स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

विसर्जन मिरवणुकीसाठी नगरपालिकेकडील बांधकाम विभाग, विद्युत विभाग, आरोग्य विभाग, वाहन विभाग, डॉ. आंबेडकर रूग्णालयाकडील अधिकारी–कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. मुख्याधिकारी दीपक पाटील, कामगार अधिकारी विजय राजापुरे यंत्रणेवर नियंत्रण ठेवून होते. स्वच्छता मोहिमेवेळी रोटरी क्लब सेंन्ट्रल, अॅन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य, शहरातील विविध सामाजिक संघटना, विविध शाळातील विद्यार्थी आणि शिक्षक तसेच नगरपालिकेचे मुख्य स्वच्छता निरीक्षक विजय पाटील, स्वच्छता निरिक्षक, प्रभाग निरिक्षक यांचेसह आरोग्य विभागाकडील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

- **२२५ अधिकारी कर्मचाऱ्यांचा सहभाग**
- **४०० विद्यार्थी शिक्षक सहभागी**
- **१० टन निर्माल्य, ५०० किलो प्लास्टिक केले वेगळे**
- **राष्ट्रीय सेवा योजनेच्या ८५ स्वयंसेवकांचे सहकार्य**

Scanned with CamScanner

दै. तरूण भारत

6/10/2018

# महात्मा गांधींचा विचार देशाला मिळालेली मोठी देणगी

## प्रसाद कुलकर्णी : डीकेएएससी कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचा समारोप : विविध कार्यक्रमांचे आयोजन

**प्रतिनिधी**

इचलकरंजी

महात्मा गांधीजींचे विचार २१ व्या शतकाला मिळालेली मोठी देणगी आहे. गांधींजींनी तारूण्यात जे काही केल. त्या गोष्टींचा अभ्यास केला तर त्यातून जगण्यासाठी अधिक उर्जा मिळते. राष्ट्रांतील सर्व परिवर्तने ही तरूणांनी केली आहेत. आपण विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर शहाणपणाही घेतला पाहिजे, असे विचार समाजवादी प्रबोधिनीचे प्रसाद कुलकर्णी यांनी मांडले. ते डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या समारोप समारंभात प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे होते.

२४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना सप्ताह पार पडला. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी औपचारिक उद्घाटन करून दुसऱ्या दिवशी पंचगंगा नदी घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. या स्वच्छता मोहिमेतून प्लास्टिक कचरा व निर्माल्य असा सुमारे २ टन कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावणेत आली. तिसऱ्या दिवशी विविध माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. चौथ्या दिवशी नगरपालिकेच्या स्वच्छता पदयात्रेत सहभागी होऊन वृक्षारोपण करण्यात आले. पाचव्या दिवशी मध्यवर्ती बसस्थानकाची स्वच्छता करून तो परिसर प्रवाशांसाठी अधिक सुखकर केला व सहाव्या दिवशी "स्वच्छ भारत" या विषयावर पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले. या संपूर्ण सप्ताहात स्वयंसेवकांनी "स्वच्छता हि सेवा" हे तत्व मनाशी धरून उत्साहाने कार्य केले, अशी माहिती स्वयंसेवक ऋषीकेश राऊत यांनी अहवाल वाचन करताना सांगितले.

सामाजिक मुल्ये, नीतीमुल्ये यांचा सारासार विचार करून महात्मा गांधींचा जागर विद्यार्थ्यांनी करावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी अध्यक्षीय मनोगतातून केले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



इचलकरंजी – येथील डींकेएएससी महाविद्यालयात एनएसएस सप्ताहाच्या समारोप प्रसंगी प्रसाद कुलकर्णी यांचे स्वागत करताना प्राचार्य मिलिंद हुजरे व इतर

स्वागत व प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. ए. यादव यांनी केले. आभार प्रा. एम. एम. कांबळे यांनी मांडले. सूत्रसंचालन ऋषीकेश राऊत यांनी केले.

RPB / HVR

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत.

6/10/2018

# डीकेएएससी महाविद्यालयात सर्जिकल स्ट्राईक डे साजरा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयामध्ये सर्जिकल स्टाईक डे साजरा करणेत आला. ५६ महाराष्ट्र बटालियन एससीसी ६ महाराष्ट्र, महाराष्ट्र बटालियन आणि शिवाजी विद्यापिठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले. या कार्यक्रमात कन्या महाविद्यालय, गोविंदराव हायस्कूल, डॉ.बापूजी साळूंखे हायस्कूलचे सर्व एन.सी.सी छात्रसैनिकांनी सहभाग घेतला. सर्जिकल स्ट्राईक डे या कार्यक्रमाता एस.सी.सी. च्या मुला मुलींची रॅली, ए.एस.सी. महाविद्यालय ते शिवाजी पुतळा मार्ग परत ए.एस.सी. महाविद्यालयात पर्यंत काढण्यात आली. एन.सी.सी. ऑफिसर सी.सी.कोरे यांनी आभार मानले. प्रा.अशोक पाटील यांनी सुत्रसंचालन केले.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ दि. 16/10/2018

# 'रोटरी'तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

इचलकरंजी, ता. १५ : आजच्या युगात तंत्रज्ञान खूप बदलले आहे. तंत्रज्ञानाने जगात एका प्रकारे रक्तहीन क्रांती केली आहे. तंत्रज्ञानाने ज्ञानामधील विषमता दूर केली आहे. त्याचा फायदा आपण घ्यायला हवा. अर्थात असे असले तरी तंत्रज्ञान हे साधन आहे आणि साधन गुणवत्ता देऊ शकत नाही. गुणवत्ता ही शिक्षक देऊ शकतात आणि त्यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्ता व संस्कार द्यायला हवेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.



**इचलकरंजी : रोटरी क्लबच्यावतीने आदर्श शिक्षकांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आदी.**

येथील रोटरी क्लब परिवाराच्यावतीने आयोजित शिक्षक गौरव पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सौ. प्रज्ञा योगेश करंदीकर (वालवाडी) शरद इंग्लिश मीडियम स्कूल, संतोष राजाराम चव्हाण (प्राथमिक) एन. डी. मगदूम प्राथमिक विद्यामंदिर, सौ. भारती विकास कासार (हायस्कूल) डीकेटीई इंग्लिश मीडियम हायस्कूल, डॉ. सुभाष इंगळे (महाविद्यालय) डीकेएएससी कॉलेज आणि संभाजी शिवाजी कुंभार (ग्रामीण) आण्णासाहेब राजमाने विद्यालय रुई या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. शशिकांत खोत (हुपरी) यांनी मनोगत व्यक्त केले.

मुकेश जैन यांनी स्वागत केले. उपक्रम प्रमुख व सहायक प्रांतपाल अमर डोंगरे यांनी प्रास्ताविक केले. निवेद धांदनिया यांनी फोर वे टेस्टचे वाचन केले. रवी अडुकिया आणि सौ. पूनम मोहता यांनी स्वागत केले. कौस्तुभ दातार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन मनीष मुनोत यांनी केले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ

27/10/2018

# डीकेएएससी महाविद्यालयात जीव विज्ञान प्रदर्शन

## प्राणीशास्त्र विभागाचे आयोजन; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**इचलकरंजी, ता. २६ :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे जन्मशताब्दी वर्ष व वन्यजीव सप्ताहानिमित्त डीकेएएससी महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागातर्फे जीव विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. हातकणंगले पंचायत समितीचे सदस्य महेश पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. चंदूर गावचा गल्ली ते दिल्लीपर्यंत जो सन्मान झाला, त्यात महाविद्यालयाचा मोठा वाटा आहे, असे महेश पाटील यांनी नमूद केले.

जीव विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी अनेक वास्तव विषयांवरील वैविध्यपूर्ण प्रतिकृती बनवल्या. पाणी प्रदूषण, पाणी शुद्धीकरण, वन्यजीव व पक्षी संवर्धन, जागतिक तापमानवाढ, टाकाऊपासून टिकाऊ, कचरा व्यवस्थापन, धूम्रपान हानिकारक, सेंद्रिय शेती अशा अनेक मानवी व नैसर्गिक संवर्धनावर आधारित विद्यार्थ्यांनी बोलक्या प्रतिकृती तयार केल्या. प्रदर्शनात विद्यार्थ्यांना भिन्न जातीच्या पक्षी व प्राण्यांचे प्रकारही पाहावयास मिळाले. हे प्रदर्शन पाहण्यासाठी परिसरातील विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डी. ए. यादव, प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. डी. सी. कांबळे, प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील, प्रा. डॉ. रेश्मा सनदी, प्रा. फातिमा मुल्ला आदी उपस्थित होते. संजय खूळ, प्रा. सी. बी. पाटील, प्रा. नागराळे यांनी परीक्षकाचे काम पाहिले.



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागातर्फे जीव विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना महेश पाटील, डॉ. मिलिंद हुजरे, संजय खूळ, प्रा. डॉ. पी. के. वाघमारे.**

### प्रदर्शनातील विजेते

**प्रदर्शनात प्रथम क्रमांक पूजा केर्ले व शुभांगी कुऱ्हाडे, द्वितीय क्रमांक सिमरन शेख व सोनाली पाटील, तृतीय क्रमांक रोहन मुजावर व आशपाक देसाई यांनी मिळविला; तर उत्तेजनार्थ पारितोषिक राहुल पाटील व रोहन गारे यांनी प्राप्त केले.**

Scanned with CamScanner

दै. सकाळ 29/10/2018

# युवा महोत्सवात कोरेगावच्या भोसले कॉलेजची बाजी

## सांगलीत ५ ऑक्टोबरपासून मध्यवर्ती महोत्सव; महावीर महाविद्यालय दुसरे


**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २८ : येथील महावीर महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या युवा महोत्सवात कोरेगावच्या डी. पी. भोसले कॉलेजने सर्वाधिक गुण मिळवत बाजी मारली. महावीर महाविद्यालय दुसऱ्या तर मुधोजी कॉलेज (फलटण) तिसऱ्या स्थानावर राहिले.

विलिंग्डन कॉलेज (सांगली), केआयटी कॉलेज (कोल्हापूर), आर. बी. माडखोलकर कॉलेज (चंदगड) या महाविद्यालयांनी अनुक्रमे चौथा, पाचवा व सहावा क्रमांक पटकावला.

सांगलीतील विलिंग्डन कॉलेजमध्ये पाच ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या मध्यवर्ती महोत्सवासाठी या महाविद्यालयांची निवड झाली.



कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात झालेल्या युवा महोत्सवात नृत्य सादर करताना एका महाविद्यालयाचा संघ.

### विविध स्पर्धांचा अनुक्रमे निकाल असा...

- **मराठी वक्तृत्व** : डी. आर. माने कॉलेज (कागल), दूधसाखर महाविद्यालय (बिद्री), राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर).
- **हिंदी वक्तृत्व**: जयसिंगपूर कॉलेज, गोखले कॉलेज (कोल्हापूर), राजर्षी शाहू कॉलेज (रुकडी).
- **इंग्रजी वक्तृत्व** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज (पेठवडगाव), दूधसाखर (बिद्री), सर्व अधिविभाग (शिवाजी विद्यापीठ).
- **वादविवाद** : न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज, दूधसाखर (बिद्री).
- **लोककला** : दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी), सदाशिवराव मंडलिक कॉलेज (मुरगूड), शरद इन्स्टिट्यूट (यड्राव).
- **लोकनृत्य** : आजरा महाविद्यालय, शिवशाहू (सरूड), विवेकानंद कॉलेज.
- **लोकवाद्यवृंद** : विवेकानंद, आजरा महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज.
- **समूहगीत** : सर्व अधिविभाग (शिवाजी विद्यापीठ), विवेकानंद, कॉमर्स कॉलेज.
- **नकला** : यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, आजरा महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज.
- **एकांकिका** : शरद इन्स्टिट्यूट, विवेकानंद कॉलेज, दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी)
- **लघुनाटिका** : विवेकानंद, भारती विद्यापीठ, न्यू कॉलेज.
- **पथनाट्य** : डॉ. घाळी कॉलेज (गडहिंग्लज), भोगावती कॉलेज, कॉमर्स कॉलेज.
- **मूकनाट्य** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज (पेठवडगाव), विजयसिंह यादव कॉलेज (पेठवडगाव), श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय (इचलकरंजी).
- **सुगम गायन** : राजाराम कॉलेज, विवेकानंद कॉलेज, आजरा महाविद्यालय.

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत : दि. 29/10/18

## 'डिकेएएससी'मध्ये ११५ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**इचलकरंजी :** येथील डिकेएएससी महाविद्यालयामध्ये शिक्षण महर्षी डॉ.बापूजी साळूंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित जीवनधारा ब्लड बँकेच्या सहाकार्याने रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरमाध्ये ११५ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजहिताच्या कार्यास हातभार लावला.या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ.हुजरे यांनी महाविद्यालयाच्या एनएसएस व एनसीसी यांच्या पुढाकाराने डॉ.बापूजी साळूंखे जन्मशताब्दी वर्षामध्ये अनेक विविध कार्यक्रमाचे योग्य असे संयोजन पुर्वक पार पडत आहेत. असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डि.ए.यादव व एनसीसी ऑफीसर कॅप्टन एम.जे.वीरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

CS Scanned with CamScanner

दै. महासत्ता
दि. ३०/१०/२०१८

"पहिले महायुद्ध शताब्दी वर्ष"

स्थळ - उद्घाटन, मार्गदर्शनपर भाषण जयवंत महा इचलकरंजी

प्रा. अरुण कटकोळे
इतिहास विभागप्रमुख,
डि.के.ए.एस.सी. कॉलेज
इचलकरंजी

# महायुद्धाच्या परिणामातून शांततेचा संदेश घ्यावा - प्रा. कटकोळे

इचलकरंजी,ता.२९–

महायुद्धाच्या परिणामातून शांततेचा संदेश घ्यावा, युद्ध हे मानव जातीसाठी विनाशकारी असते, असे प्रतिपादन प्रा. अरुण कटकोळे यांनी केले.

जयवंतराव आवळे शिक्षण प्रसारक मंडळाच्या जयवंत महाविद्यालय येथे इतिहास, एनएसएस व भुगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पहिले महायुद्ध समाप्ती शतकपूर्ती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रा. कटकोळे यांनी पहिले महायुद्ध तसेच साम्राज्य विस्तार आणि लष्करी करार या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. प्रकाश पाटील होते.याचे संयोजन प्रा. डॉ. माधुरी खोत, प्रा.डॉ. शंकुतला चव्हाण, प्रा. मोहन जोशी, प्रा. वसंत भागवत यांनी केले होते.

यानंतर प्रा. डॉ. प्रकाश पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमानंतर पुस्तक प्रदर्शन, पोस्टर प्रदर्शन सर्वांसाठी खुले करण्यात आले. सुत्रसंचालन प्रा. शकुंतला चव्हाण यांनी तर आभार प्रा. डॉ. मोहन जोशी यांनी मानले.

३० मार्च, २०१८

CS Scanned with CamScanner

दै तरुण भारत

दि 7/12/18

थोडक्यात महत्त्वाचे

## वनस्पतीशास्त्र विभागात 'जागतिक मृदा दिन' साजरा

**इचलकरंजी :** माती हा आरोग्यदायक अन्ननिर्मितीचा पाया आणि संवर्धनाची गरज लक्षात घेऊन डीकेएएससी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला.जमीन हा मर्यादित स्वरूपाचा नैसर्गिक स्रोत असल्यामुळे त्याची योग्य जोपासना करून भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीचे आरोग्य सुस्थितीत ठेवणे ही आपली जबाबदारी आहे,असे मत प्रा.डॉ.अतिष पाटील यांनी मांडले. अध्यक्षस्थानी प्रोफेसर डॉ.सी. आर. पाटील. होतें. वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी प्रा.डॉ. व्ही. ए.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या माती परीक्षण प्रकल्पाचे सादरीकरणही करण्यात आले.

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

13/12/2018

# डीकेएएससीच्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



इचलकरंजी : यश मिळवलेल्या खेळडूंच्या समवेत प्राचार्य मिलिंद हुजरे, मार्गदर्शक शिक्षक व इतर.

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

डीकेएएससी महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध शालेय शासकीय क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळवले. त्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्फूर्ती माने हिने १७ वर्षीय राज्यस्तरीय उंच उडी स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून दिल्ली येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड निश्चित केली. तसेच प्रसाद पेडणेकर याची ही उंच उडी क्रीडा प्रकारात रांची येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अलिशा नायकवाडी हिने राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून भोपाळ येथील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. या सर्व खेळाडूंना प्राचार्य डॉ मिलिंद हुजरे, रजिस्टर लोकरे यांचे सहकार्य लाभले. प्रा. कॅप्टन एम.जे.विरकर, प्रा.आकाश

Scanned with CamScanner

दै. महासत्ता

3/1/2019

# कदम कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

**इचलकरंजी,ता.२–**

येथील दत्ताजीराव कदम ए.एस.सी.कॉलेज मध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन डॉ.राजेंद्र पोंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे होते. याप्रसंगी डॉ.राजेंद्र पोंदे यांनी पर्यावरण आणि साहित्या या विषयावर व्याख्यान दिले. इंग्रजी विभागाच्या भित्तीपत्रिकेचे प्रकाशन तसेच नोबेल पारितोषिक विजेते व्ही.एस.नायपॉल यांच्या जीवनकार्यावर आधारित हस्तलिखिताचेही प्रकाशन डॉ.राजेंद्र पोंदे यांच्या हस्ते आणि मा.प्राचार्य यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी प्रा.सौ.एस.जे.वेल्हाळ यांनी स्वागत आणि प्रस्ताविक केले. प्रा.सौ.शैलजा चनगुंडी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. विद्यार्थी श्री.अरुण कोळी यांनी आभार मानले आणि कु.ऐश्वर्या महाले यांनी सूत्रसंचालन केले. या कर्यक्रमप्रसंगी डॉ.नुराणी एस.आय.डॉ.घोडके डी.जी., डॉ.आळवेकर ई.बी., डॉ.बेंद्रे एस.बी., प्रा.कांबळे एम.एम., प्रा.पाटील व्ही.बी., प्रा.नंदगावे ए.बी., आदि प्राध्यापक, कर्मचारी वृंद व विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत — 5 जाने 2019

# ए. एस. सी कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम ए.एस.सी. कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन डॉ.राजेंद्र पोंदे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.मिलींद हुजरे होते. इंग्रजी विभागाच्या भितीपत्रिकेचे प्रकाशन तसेच नोबेल पारितोषिक विजेते व्ही.एस.नायपॉल यांच्या जीवनकार्यावर आधारीत हस्तलिखिताचे प्रकाशन डॉ.राजेंद्र पोंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. एस.जे.वेल्हाळ यांनी स्वागत केले. प्रा.शैलजा चनगुंडी यांनी परिचय करून दिला. विद्यार्थी अरूण कोळी यांनी आभार मानले. या कार्यक्रमप्रसंगी डॉ.नुराणी एस.आय.डॉ.घोडके डी.जी., डॉ.आळवेकर ई.बी., डॉ.बेंद्रे एस.बी., प्रा.कांबळे एम.एम., प्रा.पाटील व्ही.बी. आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत
5 जाने 2019

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयात बालिका दिन उत्साहात

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम ए.एस.सी. महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १८६ वी जयंती उत्साहात साजरी झाली. सावित्रीबाई फुले यांच्यामुळे आज स्त्रिया सर्वच क्षेत्रांत कार्यरत आहेत. आजची स्त्री आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाली तर खऱ्या अर्थाने स्वावलंबी होईल. समाज सुशिक्षित करायचा असेल तर स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे, असे मौलिक विचार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी मांडले. यावेळी प्राणिशास्त्र विभागातील विद्यार्थीनींनी विविध पोस्टर्सच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा संपूर्ण जीवनपट प्रदर्शित केला. ऋतुजा पाटील हिने आपले मनोगत व्यक्त केले. आरती पोवार आणि जास्मिन मुजावर यांनी कवितांचे सादरीकरण केले. प्रास्ताविक प्रा.डॉ. निलोफर शेख यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. सलिमा नदाफ यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

दै. महासत्ता

14/1/2019



मान्यवरांच्या हस्ते चषक स्विकारताना डीकेएएससी कॉलेजचा समुह नृत्य स्पर्धेतील विजेता संघ.

# युवास्पंदन नृत्य स्पर्धेत डीकेएएससी प्रथम

**इचलकरंजी,ता.१३–**

येथील मनोरंजन मंडळ,रोटरी क्लब आणि श्रीदगडूलाल मर्दा चॅरिटेबल व रिसर्च फौंडेशन यांच्यावतीने आयोजित केलेल्या विसाव्याआंतरमहाविद्यालयीन 'युवास्पंदन' स्पर्धा उपक्रमाच्या अंतर्गत समुह नृत्य आणि वैयक्तीक नृत्य स्पर्धा उत्साहात पार पडल्या. समुह नृत्य स्पर्धेतील प्रथम क्रमांक डी.के.ए.एस.सी. कॉलेज (महेश गवंडी व सहकारी) इचलकरंजी या संघाने मिळविला तर द्वितीय क्रमांक सांगलीच्या कस्तुरबाई वालचंद कॉलेज या संघाने मिळविला. तृतीय क्रमांक कन्या महाविद्यालय इचलकरंजीच्या संघाने प्राप्त केला.

वैयक्तीक नृत्य स्पर्धेतीलप्रथम क्रमांक अनुजा राजेश पवार (श्रध्दा इन्स्टिट्युट,इचलकरंजी) हिने तर द्वितीय क्रमांक केदार गुरव (विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर) याने मिळविला.तर तृतीय क्रमांक प्रितेश रणनवरे (शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर) याने मिळविला.मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष समीर गोवंडे यांनी प्रास्ताविक केले. तर संतोष आबाळे यांनी स्वागत केले. परीक्षकांचा परिचय प्रतिक जाधव यांनीकरून दिला. याप्रसंगी प्रा. कांबळे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.यावेळी त्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. स्पर्धेचे सूत्रसंचालन पूजा मुळे, विशाल साखरे व आनंद ढमणगे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

दै. महासत्ता

15/1/2019

# युवास्पंदन गायन स्पर्धा उत्साहात संपन्न

इचलकरंजी,ता.१४–

येथील मनोरंजन मंडळ, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्यावतीने आंतरमहाविद्यालयीन युवास्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी 'भावधारा' ही हिंदी मराठी कराओके गीतगायन स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. विविध भागातील महाविद्यालयीन स्पर्धक कलाकारांनी यावेळी श्रवणीय अशी गाणी सादर केली.

स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्रियंका मिरजकर (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) हिने तर द्वितीय क्रमांक काजल धुर्वे



युवास्पंदन गायन स्पर्धेतील तृतीय क्रमांकाचे पारितोषिक स्विकारताना निखील आसोळे व उपस्थित मान्यवर.

(डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी)हिने मिळविला. यावेळी तृतीय क्रमांक निखील राजेंद्र आसोळे याने तर उत्तेजनार्थ क्रमांक विशाल स्वामी व धनश्री माने (डिकेएएससी कॉलेज, इचलकरंजी) यांनी प्राप्त केला.

सदरच्या स्पर्धेसाठी परीक्षक या नात्याने विश्वराज जोशी–कोल्हापूर, भालचंद्र अभ्यंकर–मिरज आणि मनीष आपटे–इचलकरंजी यांनी उत्तमरित्या काम पाहिले. स्पर्धेच्या सुरुवातीला समन्वयक संजय होगाडे यांनी प्रास्ताविक केले तर प्रतिक जाधव यांनी परिक्षकांचा परिचय करून दिला. मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष प्रा.समीर गोवंडे यांनी आभार व्यक्त केले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ

16/1/2019

# विवेकानंद संस्था युवा पिढी घडवणारे संस्कार केंद्र : साळुंखे

इचलकरंजी, ता. १५ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय आणि कन्या महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने संस्थांतर्गत राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेला प्रारंभ झाला. स्पर्धेत राज्याच्या विविध भागातील ४० हून अधिक संघ सहभागी झाले आहेत.

खेळाडूंनी मन, मनगट आणि मेंदू यांची ताकद निर्माण केली पाहिजे. बापूजींनी केलेल्या संस्कारामुळे आज अनेक अष्टपैलू खेळाडूंनी जगभरात नाव केले आहे. विवेकानंद संस्था आजच्या युवा पिढीला घडवणारे संस्कार केंद्र आहे, असे उद्गार संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी काढले. अध्यक्षस्थानी इचलकरंजीच्या नगराध्यक्षा अलका स्वामी होत्या.

प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी स्वागत केले. खेळाडूंना अधिक वाव मिळावा आणि भविष्यात हे खेळाडू राष्ट्राचे नेतृत्व करतील यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. खेळात प्रयत्नाचा डाव पुढे ठेवून चांगल्या प्रकारे खेळून स्वतःचे वैभव निर्माण करावे असे आवाहन क्रीडा नियोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. एस. कुंभार यांनी केले.

संस्थेच्या प्राथनेतून सुसंस्कारित पिढी घडली जाते. शिक्षणाबरोबर संस्कार रुजविण्याचे कामही चांगल्या प्रकारे या संस्थेने केले असून हे संस्कार घेऊनच या स्पर्धेत खेळाडूवृत्तीने आनंदाने खेळावे, असे विचार नगराध्यक्षा अलका स्वामी यांनी मांडले. आभार प्रा. कॅप्टन मोहन विरकर यांनी मानले. स्पर्धेत राज्याच्या विविध भागातील ४० हुन अधिक संघ सहभागी झाले. डॉ. अनिल पाटील, प्रा. कांबळे, प्रा. पाटील, प्रा. उरूणकर आदी उपस्थित होते.



**इचलकरंजी : राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचे हवेत फुगे सोडून उद्घाटन करताना अभयकुमार साळुंखे, अलका स्वामी, डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. अनिल पाटील, डॉ. बी. एस. कुंभार.**

CS Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

16/1/2019

# डीकेएएससीच्या प्राणीशास्त्र विभागाची सामाजिक बांधिलकी

**नवचैतन्य अनाथालयात वस्तूंचे वाटप**

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभागाच्या वतीनेशिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे जन्मशताब्दी वर्ष आणि स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून नवचैतन्य अनाथालयातील मुलांना स्वेटर, अन्न, फळे, शालेय व खेळाचे साहित्य यांसारख्या वस्तूंचे वाटप करण्यात आले. आपण विद्यार्थी हे उद्याचे भारताचे आधारस्तंभ आहोत. त्यामुळे चांगले शिक्षण घ्या,आनंदी रहा, आवडत्या गोष्टी करा आणि देशाचे नाव उज्ज्वल करा, असा संदेश प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी दिला. स्वामी विवेकानंद व जिजाऊंचे विचार मुलांना सांगत एक नवा संस्कार देण्याचा पर्यंत विभागप्रमुख प्रा.डॉ. पी.पी.पुजारी आणि प्रा. डॉ. पी.के वाघमारे यांनी केला.

यावेळी राजू बिदरेवाडी व नितीन तापकिरे यांनी अनाथालयातील उपक्रमांची माहिती दिली. व या उपक्रमाचे कौतुकही केले. प्राध्यापक, विद्यार्थीनींनी मुलांशी निखळ संवादाने आपलेपणा साधला. यावेळी प्रा.डॉ.निलोफर शेख, प्रा.सलिमा नदाफ, प्रा.डॉ.रेश्मा सनदी, प्रा.फातिमा मुल्ला तसेच सर्व विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ » TODAY

गुरुवार, १७ जानेवारी २०१९ २

# खो-खो स्पर्धेत डीकेएएससीच्या मुलांची बाजी

इचलकरंजी, ता. १६ : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थांतर्गत राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत सीनिअर व ज्युनिअर गटात मुलांमध्ये येथील डीकेएएससी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक, तर मुलींमध्ये येथील कन्या महाविद्यालय आणि वाठार महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या स्पर्धेचे आयोजन होते. स्पर्धेत ६० हून अधिक संघांचा सहभाग होता. स्पर्धेचा निकाल अनुक्रमे : मुले -सीनिअर : प्रथम -डीकेएएससी कॉलेज, द्वितीय - नागठाणे कॉलेज, तृतीय - एस. जी. के. कॉलेज. लोणीकाळभोर. ज्युनिअर : प्रथम - डीकेएएससी कॉलेज, द्वितीय - स्वारा भारती ज्युनिअर कॉलेज तासगाव, तृतीय - आर. पी. कॉलेज उस्मानाबाद. मुली : सीनिअर : प्रथम - कन्या महाविद्यालय, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय - राजे रामराव महाविद्यालय जत. ज्युनिअर : प्रथम - वाठार कॉलेज वाठार, द्वितीय - नागठाणे कॉलेज नागठाणे, तृतीय - श्रींबैळा कॉलेज, मेढा यांनी प्राप्त केला.

उद्योगपती राजू तिवारी, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके देण्यात आली. यावेळी प्रा. कॅप्टन मोहन विरकर, प्रा. आकाश बनसोडे, प्रा. डॉ. सविता भोसले, प्रा. सुखदेव सजगणे आदी उपस्थित होते.

# 'डिकेएएससी'मध्ये शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा

इचलकरंजी ता. १६ : बदलत्या जीवनशैलीत निर्माण होणाऱ्या समस्यांची जाणीव होणे गरजेचे आहे. शिक्षकांना सुदृढ करून उद्याची पिढी ही बलशाली होईल म्हणूनच शिक्षकांच्या माध्यमातूनच उद्याचे भविष्य घडेल, असे प्रतिपादन या संस्थेचे व्यवस्थापक आदित्य पुंदिर यांनी केले. दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात 'क्लायमेट रिअलिटी प्रोजेक्ट, भारत' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा झाली. त्यामध्ये पुंदिर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे होते.



इचलकरंजी : डिकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळेत क्लायमेट रिॲलिटी प्रोजेक्ट संस्थेच्या अधिकाऱ्यांसमवेत प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. सी. आर. पाटील, प्रा. डॉ. अतिश पाटील.

स्वागत व प्रास्ताविक समनव्ययक प्रोफेसर डॉ.सी. आर. पाटील यांनी केले. कार्यशाळेत उपस्थित शिक्षकांना हवामान बदल व पृथ्वी सुरक्षितता शाश्वत विकासाची लक्ष्ये आणि भविष्य या विषयावर तीन सत्रात मार्गदर्शन करण्यात आले. पहिल्या सत्रात आदित्य पुंदिर यांनी हवामान बदलातील होणारे परिणाम व करावयाचे उपाय याविषयी मार्गदर्शन करून शिक्षकांच्या प्रश्नांचे निरसन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. नंदिनी देशमुख यांनी आधुनिक शिक्षणव्यवस्थेतील उद्दिष्टयांची स्वरूपे व व्याप्ती अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट केली. प्रत्येक गोष्टीत शाश्वता टिकवून ठेवणे गरजेचे आहे. तरच उद्याच्या पिढीसाठी सुंदर उद्दिष्टपूर्ण समाज निर्माण होईल, असे सांगितले. तिसऱ्या सत्रात शितल अनतिल यांनी शिक्षकांना उपयुक्त होईल अशा इंटरनेटवरील महितीचा स्रोत याविषयी मार्गदर्शन करून शाळा, महाविद्यालयात कचरा व्यवस्थापन, सौरऊर्जा, पाणी संवर्धन यासारखे छोटे-मोठे प्रकल्प उभारण्याचे आवाहन केले. आजच्या पिढीला या समस्येबाबत जागरूक करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे, असे मत प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी व्यक्त केले. आभार सहसमनव्ययक प्रा.डॉ. अतिश पाटील यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

22/1/2019

# 'विवेकानंद' युवा पिढी घडवणारे संस्कार केंद्र

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे : कदम महाविद्यालयात राज्यस्तरीय खो-खो स्पर्धाचा शुभारंभ

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

बापूजींनी केलेल्या संस्कारामुळे आज अनेक अष्टपैलू खेळाडूंनी जगभरात आपले नाव केले आहे. विवेकानंद संस्था ही आजच्या युवा पिढीला घडवणारे संस्कार केंद्र आहे, असे प्रतिपादन कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले.

ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय आणि कन्या महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने संस्थांतर्गत राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेला प्रारंभवेळी बोलत होते. अध्यक्षस्थानी इचलकरंजीच्या नगराध्यक्षा सौ.अलका स्वामी होत्या. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी स्वागत केले.



**इचलकरंजी - येथील डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचे उद्घाटन करताना प्राचार्य अभयकुमार साळूंखे, प्राचार्य मिलिंद हुजरे, नगराध्यक्षा सौ. अलका स्वामी आदी.**

क्रीडा नियोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.बी.एस. कुंभार म्हणाले, भविष्यात हे खेळाडू राष्ट्राचे नेतृत्व करतील यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यश अपयश हे येतच राहते. चांगली कामगिरी करत स्वतःचे वैभव निर्माण करावे. असा मौलिक सल्लाही त्यांनी दिला.

या संस्थेच्या प्रार्थनेतूनच सुसंस्कारित पिढी घडली जाते. शिक्षणाबरोबर संस्कार रुजविण्याचे कामही चांगल्या प्रकारे केले आहे. हे संस्कार घेऊनच या स्पर्धेत खिलाडू वृत्तीने आनंदाने सहभागी व्हावे, असे मत नगराध्यक्षा सौ. अलका स्वामी यांनी मांडले. स्पर्धेत राज्यातील ४० संघांनी भाग घेतला आहे.

यावेळी संस्थेचे आजीव सेवक प्रा.कांबळे, प्रा.पाटील, प्रा.उरूणकर उपस्थित होते. प्रा.कॅप्टन मोहन विरकर यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

दै: पुण्यनगरी
दि: 29/1/2019

# एएससी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**

येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राज्यशास्त्र व समाजशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यान व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

२५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने राज्यशास्त्र व समाजशास्त्र विभागाच्या वतीने एफवाय बीएच्या वर्गात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. एसवाय व टीवायच्या वर्गात प्रा.विशाल कांबळे व सहाय्यक प्रा. अरुण काशिद यांचे मार्गदर्शन झाले.

लोकशाही व्यवस्थेमध्ये मतदारांना असलेले अधिकार व मतदारांनी बजावयाचे कर्तव्य यावर सविस्तर विश्लेषण करण्यात आले. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी मतदार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्यावतीने अस्मिता निपाणीकर, लक्ष्मण शंकरहट्टी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रा. ए. बी. टिपुगडे, प्रा. मीनाक्षी बंदलगी यांचे समाजशास्त्र विभागातील प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

30/1/2019

# डिकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राज्यशास्त्र व समाजशास्त्र विभागाच्यावतीने व्याख्यान व चर्चासत्राचे एफवाय बीए च्या वर्गात आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येनें सहभाग नोंदविला. एसवाय व टीवाय च्या वर्गात प्रा. विशाल कांबळे व सहाय्यक प्रा. अरुण काशिद यांचे मार्गदर्शन झाले. लोकशाही व्यवस्थेमध्ये मतदारांना असलेले अधिकार व मतदारांनीं बजावयाचे कर्तव्य यावर विश्लेषण करण्यात आले. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी मतदार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्यावतीने अस्मिता निपाणीकर, लक्ष्मण शंकरहट्टी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रा. ए. बी. टिपुगडे, प्रा. मिनाक्षी बंदलगी यांचे समाजशास्त्र विभागातील प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ

1/2/2019

# सेवा गौरव सन्मानपत्राने डॉ. पाटील यांचा सत्कार

**इचलकरंजी, ता. ३१ :** येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ.चंद्रहास पाटील यांचा सेवा गौरव सत्कार समारंभ झाला. यावेळी संशोधन क्षेत्रातील तसेच आजी-माजी विद्यार्थी, प्राध्यापकांनी प्रा. डॉ. पाटील यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केल्या.

डॉ. पाटील यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक आणि संशोधन कार्याचा जीवनपट उपस्थितांसमोर उलघडून दाखवला. डॉ. पाटील यांनी ३५ वर्षांच्या सेवेत वनस्पतिशास्त्रात अनेक नावीन्यपूर्ण संशोधन केले. याचा फायदा आजच्या विद्यार्थ्यांसाठी होत आहे, असे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी सांगितले. महाविद्यालयाच्यावतीने डॉ. पाटील यांचा सेवा गौरव सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. प्रा. वांद्रे, प्रा. डॉ. यादव, प्रा. डॉ. विजयकुमार पाटील, प्रा. डॉ. शेखर मोहिते, प्रा. अर्जुन जाधव आदींनी डॉ. पाटील यांच्यावरील असलेले प्रेम, कृतज्ञता मनोगतातून व्यक्त केल्या.

डॉ. पाटील व त्यांच्या कुटुंबीयांनी निवृत्तीनिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे संशोधन करता यावे व विद्यार्थी चांगल्या प्रकारे शिकतील या उद्देशाने आर्थिक मदत महाविद्यालयाकडे सुपूर्द केली.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ दि. 5/2/19

# कदम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची 'बालोद्यान'ला भेट

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. ४ : अब्दुललाट येथील बालोद्यान संकुलात असणारी कृती, शिस्त आणि संस्कार आम्हाला आयुष्यात चांगल्या प्रकारे घडवतील, अशा भावना दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. या वेळी विभागातर्फे बालोद्यानाला अन्नधान्य, फळे, गरजोपयोगी साहित्य आणि आर्थिक मदत देण्यात आली.

सामाजिक बांधिलकी जपत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये समाजातील अनाथ, वंचित मुलांसाठी मदत करण्याची जाणीव निर्माण झाली. म्हणून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थी, प्राध्यापकांनी बालोद्यानाला भेट दिली आणि गरजोपयोगी साहित्य व आर्थिक मदत दिली. बालोद्यानाचे संस्थापक कुलभूषण बिरनाळे यांनी उभ्या केलेल्या कार्याचे कौतुक प्रा. डॉ. विजयकुमार पाटील यांनी केले.

बालोद्यानात शिक्षणाबरोबर व्यवहारज्ञानात तरबेज असणारी मुले आज शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत असून, येथे मुलांचा सामाजिक, आर्थिक, शारीरिक, बौद्धिक, सांस्कृतिक विकास चांगल्या प्रकारे होत आहे, अशी माहिती व्यवस्थापक निर्मला काटे यांनी दिली. महाविद्यालयाने केलेल्या या उपक्रमाचे कौतुकही केले. प्रा. डॉ. सुभाष इंगळे, प्रा. मधुमती शिंदे, प्रा. आरती खोत आदी उपस्थित होते.



अब्दुललाट : येथील बालोद्यान संकुलाला एएससी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी भेट दिली.

दै. तरुण भारत

11/2/2019

# यशाला गवसणी घालताना माणसात रहा

## नितीन कुळकर्णी : एएससी महाविद्यालयात पारितोषिक वितरण

प्रतिनिधी

इचलकरंजी

कोणत्याही क्षेत्रात यशाला गवसणी घालत असताना. नेहमी माणसातच राहायला हवे. विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश ही केवळ सुरुवातच असून, यापुढे उत्तुंग शिखरे गाठायला हवीत. तसेच सवय महत्त्वाची पण वय महत्वाचे नाही, असे प्रतिपादन सिनेअभिनेते नितीन कुलकर्णी यांनी केले.

येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इचलकरंजी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ.अलका स्वामी होत्या.

नगराध्यक्षा सौ. अलका स्वामी म्हणाल्या ,शिक्षण आणि सुसंस्कार रुजविण्याचे काम श्री स्वामी विवेकानंद संस्था करीत आहे.



इचलकरंजी - पारितोषिक देऊन सन्मानित करताना प्रमुख पाहुणे सिनेअभिनेते नितीन कुलकर्णी, पोलीस उपनिरीक्षक प्रज्ञा चव्हाण प्राचार्य डॉ मिलिंद हुजरे समवेत उपस्थित मान्यवर (छाया - शरद पाटील,चंदूर)

स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनचा आढावा घेतला आणि विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

शिवाजीनगर इचलकरंजी पोलिस स्टेशनच्या पोलिस उपनिरीक्षक प्रज्ञा चव्हाण, निर्भया पथकाचे प्रमुख रोहन पाटील उपस्थित होते. अहवाल वाचन जिमखाना प्रमुख. प्रा.आकाश बनसोडे यांनी केले. यावेळी क्रीडा प्रमुख प्रा.कॅप्टन मोहन विरकर, प्रा.डी. सी.कांबळे, प्रा.व्ही. एस. वांद्रे, प्रा.एम.एम.कांबळे, प्रा.डी.ए. यादव, प्रा.डॉ.सुभाष इंगळे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा विश्वंबर कुलकर्णी, ऋषिकेश राऊत यांनी केले. आभार महेश गवंडी यांनी मानले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ

12/2/2019

# एएससी महाविद्यालयाचे पारितोषिक वितरण

इचलकरंजी, ता. ११ : कोणत्याही क्षेत्रात यश मिळाले तरी माणसातच राहायला हवे. विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश ही केवळ सुरवातच असून यापुढे उत्तुंग शिखरे गाठायला हवीत. तसेच सवय महत्त्वाची पण वय महत्त्वाचे नाही, असे प्रतिपादन सिनेअभिनेते नितीन कुलकर्णी यांनी केले. येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी इचलकरंजी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा अलका स्वामी होत्या. नगराध्यक्षा स्वामी म्हणाल्या, "शिक्षण आणि सुसंस्कार रुजविण्याचे काम श्री स्वामी विवेकानंद संस्था करीत आहे."



**इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमावेळी नितीन कुलकर्णी, पोलिस उपनिरीक्षक प्रज्ञा चव्हाण, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे आदी.**

स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. शिवाजीनगर इचलकरंजी पोलिस स्टेशनच्या पोलिस उपनिरीक्षक प्रज्ञा चव्हाण, निर्भया पथकाचे प्रमुख रोहन पाटील उपस्थित होते. अहवाल वाचन जिमखाना प्रमुख प्रा. आकाश बनसोडे यांनी केले. क्रीडा प्रमुख प्रा. कॅप्टन मोहन वीरकर, प्रा. डी. सी.कांबळे, प्रा. व्ही. एस. वांद्रे, प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. सुभाष इंगळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. विश्वंबर कुलकर्णी, हृषीकेश राऊत यांनी केले. आभार महेश गवंडी यांनी मानले.

Scanned with CamScanner

तरुण भारत

14/2/2019

# मनाबाहेरील स्वच्छता अधिक गरजेची

## प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे : डीकेएएससीमध्ये एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

आज मनाची आणि मनाबाहेरील स्वच्छतेचीही गरज आहे, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी केले.

इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षानिमित्त "स्वच्छ भारत अभियानाचा पर्यावरण आणि समाजावरील प्रभाव' या विषयावर अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

स्वच्छता विषयावर तयार केलेल्या शोधपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, अस्वच्छतेचा भस्मासुर कोणी केला याचा शोध आपण सर्वप्रथम घेतला पाहिजे. या अस्वच्छतेला माणूसच सर्वस्वी जबाबदार आहे.

माजी मंत्री प्रकाश आवाडे म्हणाले,परिसरातील प्रदूषणाबरोबरच वैचारिक प्रदूषण दूर करणे गरजेचे आहे.



इचलकरंजी – स्वच्छता संशोधन पत्रिकेचे प्रकाशन करताना प्रा. डॉ. पी. डी. राऊत, राजर मुठाणे, प्राचार्य मिलिंद हुजरे, प्रा एम एम कांबळे व उपस्थित मान्यवर

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख पी डी राऊत यांचे बीजभाषण झाले.प्राचार्य डॉ मिलिंद हुजरे यांनी स्वागत केले.पाहुण्यांची ओळख सहसमनवयक डॉ.डी.सी. कांबळे यांनी करून दिली.जिल्हा अधिकारी अविनाश सुभेदार यांनी आपल्या शुभेच्छा पाठवल्या.

यावेळी राजर मुठाणे,सुनिल पाटील,राहुल आवाडे आदी उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रात प्रा डॉ व्ही बी जुगळे, प्रा डॉ संजय ठिगळे यांच्या उपस्थितीत परिसंवाद घेण्यात आला. तिसऱ्या सत्रात शोध निबंधाचे वाचन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रा पी बी कांबळे होते.

समनवयक प्रा एम एम कांबळे यांनी आभार मानले.सूत्रसंचालन प्रा एस जे वेल्हाळ,प्रा एस ए चनगुंडी, प्रा. डॉ. अतिश पाटील यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ

21/2/2019

# मन स्वच्छ असल्यास मनगट भक्कम

## अभयकुमार साळुंखे : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

**इचलकरंजी, ता. २० : मन स्वच्छ असेल तर भक्कम मनगट तयार होतं, त्यासाठी मनाची आणि मनाबाहेरील स्वच्छतेचीही गरज आहे, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी केले.**

इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'स्वच्छ भारत अभियानाचा पर्यावरण आणि समाजावरील प्रभाव' या विषयावर सामाजिक शास्त्र विषयांच्यावतीने राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन आणि स्वच्छता विषयावर तयार केलेल्या शोधपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

माजी मंत्री प्रकाश आवाडे म्हणाले, "आपल्या परिसरातील प्रदूषणाबरोबरच वैचारिक प्रदूषण दूर करणे गरजेचे. आर. आर. पाटील यांनी सर्वप्रथम स्वच्छतेचे अभियान सुरू केले. पंचगंगा शुद्ध करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत." कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख पी. डी. राऊत यांचे बीजभाषण झाले. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख सहसमन्वयक डॉ. डी. सी. कांबळे यांनी करून दिली. राजन मुठाणे, सुनील पाटील, राहुल आवाडे आदी उपस्थित होते.

समारोपाच्या सत्रात इचलकंजी नगरपालिकेचे मुख्याधिकारी दीपक पाटील व अतिरिक्त मुख्याधिकारी डॉ. पवन म्हेत्रे यांनी स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. समन्वयक प्रा. एम. एम. कांबळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. एस. जे. वेल्हाळ, प्रा. एस. ए. चनगुंडी, प्रा. डॉ. अतिश पाटील यांनी केले.



**इचलकरंजी : 'स्वच्छ भारत अभियानाचा पर्यावरण आणि समाजावरील प्रभाव' या विषयावर आयोजित चर्चासत्रात विशेषांकाचे प्रकाशन करताना डॉ. अभयकुमार साळुंखे, डॉ. मिलिंद हुजरे, प्रा. एम. एम. कांबळे आदी.**

### शोधनिबंधाचे वाचन

दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. व्ही. बी. जुगळे, प्रा. डॉ. संजय ठिगळे यांच्या उपस्थितीत परिसंवाद झाला. तिसऱ्या सत्रात शोध निबंधाचे वाचन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रा. पी. बी. कांबळे होते. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्राध्यापक अरुण काशीद यांनी तयार केलेल्या सफा शॉर्टफिल्म व स्वच्छता दूत ही डॉक्युमेंटरी फिल्म दाखविण्यात आली. त्याबद्दल त्यांचा सत्कारही करण्यात आला.

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

9/3/2019

# एएससी महाविद्यालयात जनऔषधी दिन उत्साहात

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने जनऔषधी दिन साजरा झाला. गरिबांना स्वस्त औषधे मिळावी आणि औषधाविना कोणाचा मृत्यू होऊ नये,या उद्देशाने भारतीय जनऔषधी परियोजना अस्तित्वात आली. जनऔषधी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात 'जनऔषधी जागृती व महिला आरोग्य'यावर संवादशाळा घेण्यात आली. दैनंदिन जीवनात विद्यार्थीनींनी आरोग्याची काळजी कशाप्रकारे घ्यावी, याविषयी मार्गदर्शन प्रा.सौ. चनगुंडी व प्रा.सौ. वेल्हाळ यांनी केले.



**इचलकरंजी – कु. अस्मिता पाटील हिने तयार केलेल्या 'द चेंजिग इकॉनॉमिकस इन मेडिसिन' या प्रकल्पाचे अनावरण करताना उपस्थित मान्यवर.**

यावेळी कु.अस्मिता पाटील हिने तयार केलेल्या 'द चेंजिग इकॉनॉमिकस इन मेडिसिन' या प्रकल्पाचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अस्मिता पाटील हिने या प्रकल्पाविषयी विस्तृत माहिती उपस्थितांसमोर मांडली. विभागाच्या वतीने जनऔषधी सुविधा योजनेअंतर्गत नॅपकिनचे वाटप करण्यात आले.यावेळी प्रा.व्ही.बी.पाटील, प्रा. एम. बी.हिरगुडे, प्रा.टी.ए.हाराळे,प्रा.आकाश बनसोडे, प्रा.एम.एम.कांबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.सौ. वर्षा शिंदे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

13/3/2019

13 मार्च 2019 । तरुण भारत

# एएससी महाविद्यालयात प्राध्यापिकांचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार



इचलकरंजी – महाविद्यालयातील महिला प्राध्यापिकांचा सन्मान करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मिलिंद हुजरे

प्रतिनिधी
इचलकरंजी

दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा झाला. महाविद्यालयिन विद्यार्थीनींनी सबल व चांगल्या प्रकारे सक्षम व्हावे, यासाठी महाविद्यालयाच्या महिला सबलीकरण कमिटीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्वच महिला प्राध्यापिकांचा सन्मान प्राचार्य डॉ मिलिंद हुजरे यांच्या हस्ते करण्यात आला.विद्यार्थीनींनी स्वत:च्या पायावर उभे राहून समाजात सक्षमपणे जगावे,असे मत कमिटीच्या समनवयक प्रा. डॉ. पी.पी.पुजारी यांनी मांडले व कार्यक्रम घेण्याविषयीचा उद्देश आपल्या प्रस्ताविकातून स्पष्ट केला.

महिलांनी आर्थिक स्वावलंबी होणे म्हणजेच खरे महिला सक्षमीकरण आहे. आधुनिक शिक्षणप्रणालीत विद्यार्थीनींनी आत्मिक विश्वासाची जाणीव करून घेऊन योग्य शिक्षण घेतले पाहिजे, असे विचार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी मांडले.समाजजीवनातील महिलांचे वास्तव स्थान स्पष्ट करून महिलांना स्वत:च्या जगण्याकडे समयसुचकतेने पाहण्याचा दृष्टीकोन आपल्या मार्गदर्शनातून प्रा.सौ. अनिता घारे यांनी दिला. यावेळी स्त्री–पुरुष समानतेवर कु.ऐश्वर्या, यादव,कु.पुजा केर्ले, कु.अक्षता खेडकर कु.श्रद्धा परीट यांनी आपले प्रखर विचार मांडले.

CS Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

18/3/2019

# एएससी, कन्या महाविद्यालयात आज पदवी प्रदान सोहळा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स; सायन्स आणि कॉमर्स कॉलेज आणि श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय संयुक्त पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम सोमवार १८ रोजी आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी डॉ.ज्ञानेश्वर मुळे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळूंखे भुषवणार आहेत. पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १८ रोजी दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी एएससी महाविद्याल प्रांगणात ओळखपत्रासह उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे आणि प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी केले आहे.

Scanned with CamScanner

दै. सकाळ
20/3/2019

# जीवनात सर्जनशीलता आवश्यक

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे : कदम महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण

सकाळ वृत्तसेवा

**इचलकरंजी, ता. १९ : पदवी घेणे म्हणजे यशस्वी झालो असे नाही, तर आपण येथून पुढे जीवन जगण्यासाठी पात्र झालो आहोत. मला काहीतरी इतरांपेक्षा चांगले वेगळे करता आले पाहिजे, ही मशाल घेऊन वावराल तर नक्की यशस्वी व्हाल. तसेच जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात सर्जनशीलता हवीच, असे प्रतिपादन निवृत्त परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.**



इचलकरंजी : डीकेएएससी व कन्या महाविद्यालयात पदवी प्रदान करताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे. छायाचित्रात प्राचार्य अभयकुमार साळुंखे, डॉ. मिलिंद हुजरे, पंकज मेहता, डॉ. अनिल पाटील.

येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय व कन्या महाविद्यालयाच्या पहिल्या संयुक्त पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, शिवाजी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य पंकज मेहता, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य अनिल पाटील आदींची उपस्थिती होती.

डॉ. मुळे म्हणाले, ''विवेकानंद संस्थेचा आणि माझा खूप जवळचा संबंध आहे. शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांची भाषणे ऐकून जीवनात उभं राहिलो आहे. तसेच बापूजींनी सांगितलेल्या ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कारांनी मला जीवन कसे जोपासावे हे शिकवले. सर्वांनी या त्रिसूत्रीनुसार जीवन जगावे.''

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, ''डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. आपली स्वतःची यशस्वी वाटचाल आजअखेर अखंड ठेवली आहे. माणसात चांगुलपणा निर्माण करून स्वतः काहीतरी वेगळे घडले पाहिजे.''

शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रीती चनविरे, उर्मिला हिरणेकर, निकिता आयवळे, अंजली पारीख, पल्लवी होगाडे, नागेश चिल्लाळ यांच्याबरोबर ४६० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अतिश पाटील व प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी केले. परीक्षा विभाग प्रमुख प्रा. डी. ए. यादव यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

20/3/2019

# राष्ट्रीय मूल्ये जपणारी पिढी घडवा : प्रा. हुजरे

वार्ताहर

रूकडी

अभ्यासक्रमातील प्रत्येक घड्यामध्ये विविध राष्ट्रीय मूल्ये असतात. त्या राष्ट्रीय मूल्यांची जाणीव करून देवून संस्कारक्षम विद्यार्थी घडविणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले.

ते रूकडी येथील छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या पदवी प्रमाणपत्र प्रदान समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले होते.स्वागत प्राचार्या डॉ. आरती भोसले यांनी केले.



रूकडी : मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. हुजरे, व्यासपीठावर प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले, प्राचार्या डॉ. आरती भोसले, प्रा. सौ. पाटील

प्राचार्य डॉ. हुजरे यांनी पदवीपात्र शिक्षकांना बदलत्या परिस्थितीची जाणीव करून देत शिक्षकांनी माहिती तंत्रज्ञान आणि ज्ञानाने सदैव अपडेट राहायला पाहिजे, असे सांगितले.

प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले म्हणाले, प्रत्येकाने आपली कौशल्ये विकसित केली पाहिजे. या कौशल्याच्या जोरावरच नोकरीची संधी मिळविण्यासाठी आपल्यातील क्षमता सिद्ध करावी लागेल. त्यासाठी तयार रहा.

यावेळी डॉ. हुजरे व प्राचार्य डॉ. चौगुले यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात विद्यापीठाच्या मार्गदर्शक सुचिप्रमाणे महाविद्यालय परिसरातून प्रमुख पाहुणे, अध्यक्ष, प्राचार्य आणि स्नातक यांनी विद्यापीठाचा ध्वज घेवून शोभा यात्रा काढली. त्यानंतर पसायदानाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. या समारंभास महाविद्यालयाच्या परीक्षा प्रमुख प्राध्यापिका सौ. पाटील, रूकडीचे सरपंच रफिक कलावंत, उपसरपंच शमुवेल लोखंडे, राजेश अपराध, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. आर. बी. कराळे यांनी केले. आभार सौ. पाटील यांनी मानले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ

23/3/2019



रुकडी : येथे प्राचार्य डॉ. हुजरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना प्रिया कांबळे. शेजारी उपस्थित डॉ. प्रवीण चौगुले, प्राचार्या डॉ. आरती भोसले.

# संस्कारक्षम विद्यार्थी घडवणे शिक्षकांचे कर्तव्य

## डॉ. हुजरे; शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पदवीदान

रुकडी, ता. २२ : शालेय अभ्यासक्रमातील प्रत्येक घटकात घड्यांमध्ये विविध राष्ट्रीय मूल्ये असतात. त्या राष्ट्रीय मूल्यांची जाणीव करून देऊन संस्कारक्षम विद्यार्थी घडविणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन इचलकरंजी येथील एएससी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. ते रुकडी येथील छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या पदवी प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले होते.

डॉ. हुजरे यांनी पदवी पात्र शिक्षकांना बदलत्या परिस्थितीची जाणीव करून देत शिक्षकांनी माहिती तंत्रज्ञान आणि ज्ञानाने सदैव अपडेट राहण्यास सांगून तंत्रज्ञानाचा वापर व नवनवीन उपक्रम घेत प्रभावी अध्यापन करावे असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चौगुले म्हणाले, 'प्रत्येकाने आपली स्वतःची कौशल्ये विकसित केली पाहिजेत. याचु कौशल्याच्या जोरावर नोकरीत टिकून राहाल.' स्नातकांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. सरपंच रफिक कलावंत, उपसरपंच शमुवेल लोखंडे, राजेश अपराध आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्या डॉ. आरती भोसले, सूत्रसंचालन प्रा. आर. बी. कराळे यांनी केले. आभार प्रा. सौ. पाटील यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ

25/3/2019


# एनसीसी छात्रांची स्वच्छता मोहीम

## इचलकरंजीत जल दिनानिमित्त काढले नदीपात्रातील केंदाळ

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २४ : जागतिक जल दिनानिमित्त इचलकरंजी नदीपात्रातील केंदाळ काढून पाणी स्वच्छतेची मोहीम एनसीसी छात्रांकडून करण्यात आली. शहरातील डिकेएएससी महाविद्यालय, कन्या महाविद्यालय, बापूजी साळुंखे हायस्कूल व गोविंदराव हायस्कूल तसेच विविध शाळा, महाविद्यालयांतील एनसीसी छात्र या मोहिमेत सहभागी झाले होते. दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय एनसीसी विभागाच्या वतीने या मोहिमेचे आयोजन केले होते.

पाणी प्रदूषण हा मोठा प्रश्न असून सध्या विविध नद्यांमधील केंदाळ हे याचाच परिणाम आहे. म्हणूनच इचलकरंजी पंचगंगा घाटावरील नदीपात्रातील केंदाळ काढण्याची मोहीम एनसीसी छात्रांकडून यशस्वीपणे पार पडली. मोहिमेत शहरातील शाळा, महाविद्यालयातील १८३ एनसीसी छात्र सहभागी झाले होते. पाणी समस्या व संवर्धन या विषयावर प्रा. आर. डी. पिष्टे यांचे व्याख्यान झाले. मोहीम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कर्नल उदय बारावकर, कर्नल मानस चौधरी, मेजर राजेंद्र खरसे यांचे मार्गदर्शन लाभले. एनसीसी ऑफिसर कॅप्टन प्रा. मोहन विरकर, सी. पी. कोरे, एस. बी. पाटील, एस. एस. कांबळे उपस्थित होते.



**इचलकरंजी : जागतिक जल दिनानिमित्त विविध शाळांमधील एनसीसी विद्यार्थ्यांनी पंचगंगा नदी घाटाची स्वच्छता केली.**

Scanned with CamScanner

दै. तरुण भारत

26/3/2019

# ‘पदवी’जीवन जगण्याचे प्रमाणपत्र

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे प्रतिपादन : डीकेएएससी महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
इचलकरंजी

पदवी घेणे म्हणजे यशस्वी झालो असे नाही, तर आपण इथून पुढे जीवन जगण्यासाठी पात्र झालो आहोत. मला काहीतरी इतरांपेक्षा चांगलं वेगळं करता आले पाहिजे, ही मशाल घेऊन वावराल तर नक्की यशस्वी व्हाल. त्यामुळे जीवनत सर्जनशीलता हवीच, असे प्रतिपादन निवृत्त परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.



इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे, प्राचार्य अभयकुमार साळूंखे, पंकज मेहता व मान्यवर.

दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय व कन्या महाविद्यालयाच्या पदवादान समारंभात ते बोलत होते. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे ,शिवाजी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य पंकज मेहता, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, अनिल पाटील यांची उपस्थिती होती.

डॉ.ज्ञानेश्वर मुळे पुढे म्हणाले, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांची अनेक भाषणे ऐकून जीवनात उभं राहिलो आहे. तसेच बापूजींनी सांगितलेल्या ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कारांनी मला जीवन कसे जोपासावे हे शिकवले. सर्वांनी या त्रिसूत्रीनुसार जीवन जगावे. आज तरुणांनी प्रश्नाच्या मुळाशी जाऊन विचार केला पाहिजे. प्रगत देशांबरोबर भारतीय समाजव्यवस्थेत क्रियाकर्मशीलता व सर्जनशीलतेने बदल करावेत ,असेही त्यांनी सांगितले.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. मुळे यांच्याकडून- खूप काही शिकण्यासारखं आहे. माणसात चांगुलपणा निर्माण करून स्वत: काहीतरी वेगळं घडलं पाहिजे असे मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रीती चनविरे, उर्मिला हिरणेकर, निकिता आयवळे, अंजली पारीख, पल्लवी होगाडे, नागेश चिल्लाळ यांच्याबरोबर ४६० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

यावेळी प्रसाद कुलकर्णी,नरोत्तम लाटा, प्रा.एस.डी.बोराटे, प्रा. व्ही. एस. वांद्रे, प्रा.कॅप्टन मोहन विरकर,प्रा. आकाश बनसोडे,प्रा.डॉ.सुभाष इंगळे, प्रा. डॉ.विजयकुमार पाटील,प्रा.एम.एम.कांबळे प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर उपस्थित होते. स्वागत प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे तर सूत्रसंचालन प्रा डॉ.अतिश पाटील व प्रा.विश्वभर कुलकर्णी यांनी केले. प्रा. डी.ए.यादव यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner